जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

**-:प्रेस नोट :-** दिनांक :- ०३/०६/२०२६

# " भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्याची मोठी कारवाई – खुनाचे प्रकरणातील ०३ आरोपी जेरबंद "

**जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहर परिसरात खुनाचे गुन्ह्यातील ०३ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा तसेच भुसावळ बाजारपेठ पोलीसांनी २४ तासाचे आत अटक करून मोठी कारवाई केली आहे.**

दिनांक ०२/०६/२०२६ रोजी फिर्यादीची फिर्याद की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी फिर्यादीस काही एक कारण नसताना आरोपींनी संगनमत करून बेकायदेशीर जमाव जमवून आरोपी क्रमांक 1 याने लोखंडी रॉड तसेच चॉपरने वार करून गंभीर दुखापत केली. तसेच आरोपी क्र. 2 ते 6 यांनी लाकडी दांडक्यांनी व हॉकी स्टिकने पायावर, पाठीवर व हातावर मारहाण केली. तसेच आरोपी क्र. 4 याने फिर्यादीच्या पत्नीला गावठी कट्टा दाखवून "खबरदार, जर कोणाला फोन केला तर तुला गोळी घालीन" अशी धमकी दिली असल्याने **भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २८८/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), १८९(२), १९१(२), १९०, २२९, ३५२, ११५(२), ३५१(२)(३) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी श्री. राहुल गायकवाड , पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा तसेच श्री. राहुल वाघ, पोलीस निरीक्षक भुसावळ बाजारपेठ, यांना गुन्हयांचा संयुक्त तपास करुन गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याकामी मार्गदर्शनपर सुचना दिल्या. त्यानुषंगाने श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी/अंमलदार तसेच श्री. राहुल वाघ, पोलीस निरीक्षक भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन यांनी आपले अधिपत्याखाली अधिकारी/अमंलदार यांचे वेग-वेगळे पथक तयार करुन गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत योग्य त्या सूचना देऊन आदेशित केले.

तयार करण्यात आलेल्या तपास पथकाने तात्काळ तपास सुरू करुन तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार यांचेकडुन खात्रीदायक प्राप्त माहितीचे आधारावर **भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाकडुन आरोपीत नामे कुंदन अनिल पठारे वय १९ रा. वाल्मिक नगर, भुसावळ व ०१ विधीसंघर्षीत बालकास तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडुन आरोपीत नामे रोहित उर्फ दादु संजय नवगिरे वय २१ रा. वाल्मिक नगर, भुसावळ यांना सदर गुन्हयांत ताब्यात घेण्यात आलेले आहे. विधीसंघर्षीत बालकास बाल निरीक्षक, जळगांव यांचे समक्ष हजर करुन त्यांचे त्याबात देण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक/राहुल वाघ, भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन हे करीत आहेत.**

**सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी भुसावळ विभाग केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. राहुल गायकवाड , पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा तसेच श्री. राहुल वाघ, पोलीस निरीक्षक भुसावळ बाजारपेठ, यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप**

**निरी/शरद वागल, पोहवा/गोपाल गव्हाळे, पोहवा/उमाकांत पाटील, पोना/विकास सातदिवे, पोकॉ/प्रशांत परदेशी, पोकॉ/राहुल वानखेडे तसेच भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणेचे पोहवा/विजय नेरकर, पोहवा/रमन सुरळकर पोहवा/कांतीलाल केदारे, पोहवा/रविंद्र भावसार, पोना/सोपान पाटील, पोकॉ/योगेश माळी, प्रशांत सोनार, सचिन चौधरी, महेंद्र पाटील, जितेंद्र विटकर, जिवन कापडे, दिलीप कोल्हे, चंद्रकात रायपुरकर या पथकाने उत्कृष्ट अशी उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव

*****************************************************************************************

